महाराष्ट्र पोलीस
# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 09/02/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

### जबरी चोरी

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत तलाव चिकन मार्केट के पास ईतवारी पेठ उमरेड येथे दिनांक 08/02/2021 चे 06.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— पुष्पा किशोरचंद जिसनानी, वय 60 वर्ष, रा. प्रोफेसर कॉलोनी मंगळवारी पेठ उमरेड ही मार्केटला भाजीपाला घेत असतांना आरोपी नामे— चंद्रकला राजु पात्रे, वय 50 वर्ष, रा. मेडीकल चौक झोपडपटटी नागपुर हि फिर्यादीचे समोर आली व फिर्यादीच्या गळयातील एक लॉकेट असलेली सोन्याची चैन 15 ग्रॅम कि. 75,000/— रू. फिर्यादीच्या गळयातुन जबरदस्तीने खिचुन चोरून पळुन गेली. तेव्हा फिर्यादीने चोर चोर असे म्हणुन ओरडुन तिचा पाठलाग करून व मार्केटचे लोक यांनी सुदधा तिचा पाठलाग करून आरोपीला पकडले. दरम्यान आरोपी नामे— चंद्रकला पात्र हिच्या हातात सोन्याची चैन मिळुन आली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 392 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार तारूदत्ता बोरसरे 9284428758 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. जलालखेडा :—दि. 07/02/2021 चे 11:00 वा. चे सुमारास 12 वर्षीय पीडित/फिर्यादी हि तिचे मैत्रिनीकडे तिचे घरी खेळायला गेली होती. दरम्यान मैत्रीण हि आतल्या खोलीत गेली होती व पीडिता हि तिचे घरी जात असता मैत्रीनीचे वडील आरोपी नामे— अरविंद चाफेकर, रा. वाढोणा ता. नरखेड याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 (अ)(2) भादंवि. सहकलम 8 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मंगेश काळे 8380887452 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर